आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१ एप्रिल २०२४ - सोमवार

देशातल्या सर्व क्षेत्रातल्या नागरिकांना, व्यावसायिकांना सोयीनुसार आणि गरजेनुसार बँकिंग करता यावं तसंच बँकिंगच्या पद्धती सुलभ होण्यासाठी धोरण निश्चितीची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. रिझर्व बँकेच्या स्थापना दिनाच्या निमित्तानं मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. डिजिटल व्यवहारांना प्राधान्य देताना रोखे विरहित व्यवहारांमधून होणाऱ्या बदलांकडे लक्ष देण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री**

सर्वसमावेशक प्रगतीसाठी विभिन्न क्षेत्रांची भविष्यातील गरज ओळखून काम करण्याची आणि अभिनव संकल्पना राबवण्याची शिफारस प्रधानमंत्र्यांनी रिझर्व्ह बँकेला केली. गेल्या १० वर्षात देशातल्या बँकिंग व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा त्यांनी भाषणात घेतला. यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ९० रुपयांच्या विशेष नाण्याचं लोकार्पण झालं.

कोरोना काळात रिझर्व्ह बँकेनं उचललेल्या पावलांचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कौतुक केलं. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला, बँकांना आणि चलनवाढ आटोक्यात आणण्याला फायदा झाल्याचं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्राला बदलत्या काळानुसार सुसंगत करण्यासाठी रिझर्व्ह बँक कार्यरत असल्याचं गव्हर्नर शक्तीकांत दास यावेळी म्हणाले.

**<><><><><><><>**

निवडणूकांच्या काळात काँग्रेसकडून जबरदस्तीने आयकर वसुली करणार नसल्याचं निवेदन केंद्र सरकारच्या वतीनं देशाचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान दिलं. लोकसभा निवडणुकीच्या काळात येत्या जुलै महिन्यापर्यंत आयकर विभागाच्या ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या कर थकबाकीची वसुली केली जाणार नाही असंही त्यांनी निवेदनात

म्हटलं आहे. केंद्र सरकारनं न्यायमूर्ती बीव्ही नागरत्ना आणि न्यायमूर्ती ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर हे निवेदन दिलं. काँग्रेस पक्षाच्या आयकर थकबाकीबाबत दिल्ली उच्च न्यायालयानं २०१६ साली दिलेल्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेला काँग्रेसनं २०१८ साली सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. या याचिकेची पुढची सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे.

**<><><><><><><>**

महिलांविषयी अवमानकारक उद्गार काढल्याबद्दल आज निवडणूक आयोगानं भाजपा खासदार दिलीप घोष आणि काँग्रेस नेते सुप्रिया श्रीनेत यांची कानउघाडणी केली. घोष यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात तर श्रीनेत यांनी भाजपाच्या लोकसभा उमेदवार कंगना रानौत यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. या दोघांनी वैयक्तिक टीका केली असून त्यामुळे आचारसंहितेतल्या तरतुदीचं उल्लंघन झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी भाजपावर केलेल्या फिक्सिंगच्या आरोपांनंतर आज भाजपानं निवडणूक आयोगाकडे दाद मागितली. पक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं यासंदर्भात आयोगाची भेट घेतली. राहुल गांधी यांचे भारतीय लोकशाहीला कमी लेखणारे तसंच इव्हीएम यंत्राविषयी काढलेले उद्गार आक्षेपार्ह असल्याचं या शिष्टमंडळानं आयोगाच्या निदर्शनास आणून दिलं. दिल्लीतल्या रामलीला मैदानावर काल झालेल्या प्रचारसभेत राहुल गांधी यांनी हे भाषण केलं होतं.

**<><><><><><><>**

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते तसंच महायुतीचे परभणी लोकसभेचे उमेदवार महादेव जानकर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.. यावेळी आमदार बबनराव लोणीकर, आमदार रत्नाकर गुट्टे, बाबाजानी दुर्राणी, रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत उपस्थित होते.

<><><><><><><>

राज्यात आजपासून नवीन वीज दर लागू झाले आहेत. इंधन अधिभार जोडल्यावर सुमारे १० टक्के दरवाढीचा बोजा महावितरणच्या ग्राहकांवर पडणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या मार्च २०२३ च्या आदेशानुसार ही दरवाढ झाली आहे. दोन वर्षांसाठी दोन टप्प्यांत वीज दरवाढ होईल. घरगुती संवर्गातील सिंगल फेजसाठी पूर्वी ११६ रुपये लागायचे. आता १२८ रुपये लागतील. थ्री फेजसाठी पूर्वीच्या ३८५ रुपयांऐवजी ४२५ रुपये लागणार आहेत. वाणिज्यिक ग्राहकांना पूर्वीच्या ४७० रुपयांऐवजी ५१७ रुपये द्यावे लागतील.

<><><><><><><>

२०२३-२४ या वित्तीय वर्षात बृहन्मुंबई महानगरपालिकेनं ३ हजार १९५ कोटी ९१ लाख ११ हजार रूपये इतकं मालमत्ता कर संकलन केलं आहे. ५०० चौरस फूटापेक्षा कमी चटईक्षेत्र असणाऱ्या निवासी सदनिकांना मालमत्ता करातून सूट देण्यात आली आहे. उर्वरित ५ लाख ९८ हजार ३८६ मालमत्ता धारकांपैकी २ लाख ५३ हजार ६०५ मालमत्ता धारकांनी कर भरणा केला असल्याचं पालिकेच्या सूत्रांनी कळवलं आहे.

<><><><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणी आजपासून आपल्यासाठी

घेऊन येत आहे. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आजच्या भागात आपण नागपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत.

//<><><><><><><>//